# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०९/२०२४ (रविवार) सायंकाळ**

---

## सर्प दंषावर गावठी औषध देणाऱ्या इसमांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे मौदा अंतर्गत मौजा खंडाळा येथे दिनांक ०९/०९/२०२४ रोजी चे १६.३० वा. १७.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे— सौ. कल्पना विजय बोंदरे, वय ४१ रा. खंडाळा हि शेतात काम करत असताना तिला सर्पाने दंश केला असता तिला गावातील सर्प दंषावर गावठी औषधी देवुन रूग्न बरा करित असलेले **आरोपी नामे— १) मोरेश्वर रामकृष्ण जाभुळे वय ६२ वर्ष २) नरेश लक्ष्मण बावने वय ५४ वर्ष दोन्ही रा. खंडाळा ता. मौदा** यांचेकडे नेले असता यातील नमुद इसमांनी त्यांच्याकडे सर्प दंषावर औषधोपचार पध्दतीचा कुठलेही मान्यताप्राप्त प्रशिक्षन घेतलेले नसतांना व त्यांच्याकडे उपचारकरण्यासंबंधाने कुठलेही वैध शैक्षणीक अधिकार प्रमाणपत्रे नसतांना सर्प दंषावर गावठी औषधचा उपचार केल्याने मृतक हिला सर्पदंषाचा विषामुळे योग्य उपचार अवधी जावुन तिची प्रकृती जास्त खराब होवुन तिला वैधकियरित्या वैदयक उपचार मिळण्यापुर्वीच ती दि. १०/०९/२०२४ चे सकाळी ०९.०० वा. मरण पावली.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— स.फौ नामदेव पुजारी पो.स्टे मौदा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे आरोपीतांविरूद्ध कलम ४,७ औषधीद्रव्ये तिलस्मी उप. (आक्षे.जाहीराती) अधि. १९५४ सह क. ३३ वैदयकीय व्यवसायी अधि. १९६१ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि दोनोडे हे करीत आहे.

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा गणपती विसर्जन व ईद सणा निमित्त रुट मार्च

पोलीस स्टेशन कोंढाळी येथील बाजारगाव व कोंढाळी टाऊन येथे आज दि. १५/०९/२०२४ रोजी ०२/१५ वाजता पासून ते ०४/१० वाजता पर्यंत मा. पोलीस अधीक्षक साहेब नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे आदेशान्वे श्री. गणपती विसर्जन व ईद सणा निमित्त रुट मार्च घेण्यात आला. सदर रुट मार्च मध्ये मा. SDPO साहेब काटोल विभाग काटोल श्री. बापु रोहम, पोलीस ठाणेचे ठाणेदार पोनि निशांत मेश्राम, पोलीस उपनिरीक्षक – ०२ पोलीस अंमलदार – १३, होम सैनिक – १२, पोलीस मुख्यालय अंमलदार १५ RPC अंमलदार – ०१+२३ असे एकूण ०४ अधिकारी व ६४ अंमलदार रूट मार्च करिता हजर होते.

तसेच पोस्टे केळवद अंतर्गत आगामी सण उत्सव गणेश उत्सव, ईद—ए—मिलाद विधानसभा निवडणूक २०२४ निमित्त पोलीस स्टेशन केळवद सपोनी अनिल राऊत ठानेदार पोलीस स्टेशन केळवद यांचे नेतृत्वामध्ये केळवद बस स्टॉप केळवद, वार्ड क्रमांक तीन ढीवरपुरा , बाजार चौक केळवद येथे रूट मार्च घेण्यात आली. सदर रूट मार्चमध्ये ०३ पोलीस अधिकारी ,१५ अंमलदार, १४ होमगार्ड सैनिक उपस्थित होते.

पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत भिवापूर शहर आणि नांद चौकी येथे पोलीस रूट मार्च घेण्यात आला सदर रूट मार्चमध्ये ०१ पोलीस उपनिरीक्षक,२५ अंमलदार, २२ होमगार्ड सैनिक उपस्थित होते.





## कृत्रिम तलावामधे केले जाणार गणेशमुर्तीचे विसर्जन

पोलीस ठाणे कळमेश्वर जिल्हा नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे कळमेश्वर तालुक्यातील सर्व नागरिकांना तसेच सार्वजनीक गणपती मंडळांना आवाहन करण्यात येत आहे की, दिनांक ०७/०९/२०२४ ते १७/०९/२०२४ पर्यंत गणेशोत्सव सन २०२४ साजरा होत आहे. तरी मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे तसेच मा. जिल्हादंडाधिकारी नागपूर व मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशानुसार जिल्हयातील सर्वत्र गणेश मुर्ती विसर्जन हे शासनाद्वारे तयार करण्यात आलेले कृत्रिम तलावामधे करणे अनिवार्य आहे तरी कळमेश्वर तालुक्यातील व शहरातील खाजगी गणपती व सार्वजनीक गणेश मंडळांना निवेदन करण्यात येते की, कळमेश्वर तालुक्यात होणारे गणेशमुर्तीचे विसर्जन हे ठिक ठिकाणी तयार करण्यात आलेले कृत्रिम तलावात करावे, कळमेश्वर येथे कृत्रिम तलाव हे तळयाची पार कळमेश्वर, मटन मार्केट कळमेश्वर, ब्राम्हणी ग्राम पंचायत, वरोडा, सवंद्री, माहुरझरी या ठिकाणी करण्यात आली असुन सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सदर कृत्रिम तलावात श्री गणेश मुर्तीचे विसर्जन करावे.



# पोस्टे कळमेश्वर पोलीसांचा रूटमार्च

पोलीस ठाणे कळमेश्वर जिल्हा नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे दिनांक १४/०९/२०२४ रोजी वेळ सायं. १७/०० वा. आगामी सण गणेशोत्सव, ईद ए मिलादुन्नबी, मसक—या गणेशोत्सव व विधानसभा निवडणुक संबंधाने मा. श्री. अनिल म्हस्के उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर व पो.नि. श्री. मनोज काळबांडे पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे अध्यक्षतेखाली रूट मार्च चे कार्यक्रम आयोजीत करण्यात आले होते. सदर रूटमार्च हे पोलीस ठाणे कळमेश्वर येथुन सुरू होउन कळमेश्वर टाउन येथील गुरूगोविंदसिंग चौक (तळयाचीपार) ते बस स्टॅन्ड चौक ते जोड मारोती चौक, बाजार चौक, सब्जी मार्केट ते संत जगनाडे चौक ते रेल्वे स्टेशन ते गुरुगोविंदसिंग चौक, ते ब्राम्हणी फाटा ते कळमेश्वर पोलीस ठाणे येथे समापन असे होते. सदर रूट मार्च मधे पोलीस ठाणे कळमेश्वर येथील ३ अधिकारी, २५ अंमलदार, तसेच दंगा नियंत्रण पथक नागपूर ग्रामीण येथील २४ अंमलदार, पोलीस मुख्यालय येथील १५ अंमलदार, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ नागपूर, येथील १ अधिकारी २१ अंमलदार, व होमगार्ड पथक कळमेश्वर येथील २० सैनिक असे एकुण ०५ अधिकारी व १०५ पोलीस व होमगार्ड जवानांच्या उपस्थितीत पार पडले.




प

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर